**महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित**

**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**

**राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाच्या (NSKFDC) योजनेअंतर्गत प्रलंबित कर्ज प्रकरणांत करावयाची अंमलबजावणी जाहिरात 2021**

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळास केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाकडून मिळणाऱ्या कर्ज निधीतून या महामंडळाच्या अंतर्गत सफाई कर्मचारी/सफाई कर्मचारी कुटुंबातील अवलंबित लाभार्थ्यांसाठी जिल्हा कार्यालयातील प्रलंबित कर्ज प्रकरणांत कर्ज योजना राबविण्यात येणार आहे.

प्रलंबित कर्ज प्रकरणांतील अर्जदारांनी त्यांना ज्या व्यवसायासाठी कर्ज घ्यावयाचे आहे, त्यासाठी त्या त्या गटातील तरतूदीनुसार महामंडळाच्या 43 व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून दिनांक 14 जुलै 2021, सकाळी 9.00 वा. ते 30 जुलै, 2021 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत महामंडळाचे mpbcdc.maharashtra.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत. या योजनेच्या अटी, शर्ती व इतर आवश्यक कागदपत्रांची सूची उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (अर्जदाराने संगणक/लॅपटॉपद्वारे ऑनलाईन अर्ज दिलेल्या संकेतस्थळावर जावून Loan Management System या सदरात लॉगिन तयार करुन सादर करावे.

उद्दिष्टांपेक्षा जास्त कर्ज प्रकरणे प्राप्त झाल्यास सदर संगणक प्रणाली Auto Lock (बंद) होईल. अर्ज ऑनलाईन करताना काही अडचणी उद्भवल्यास info.mpbcdc@gmail.com या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा. दूरध्वनी/भ्रमणध्वनीद्वारे कोणतीही तक्रार/समस्या स्वीकारली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**आदेशावरुन**

**महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित**

# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

CIN No.U74999MH1978SGC020479


क्रमांक- मव्य/ प्रकल्प-३/ 475/२०२१ दिनांक- १३.०७.२०२१

प्रति,

प्रादेशिक व्यवस्थापक (सर्व)

जिल्हा व्यवस्थापक (सर्व)

महात्मा फुले मागासवर्ग विकास

महामंडळ मर्यादित

**विषय:- एनएसकेएफडीसी योजनेअंतर्गत प्रलंबित कर्ज प्रकरणांत निपटारा करणेबाबत.**

**संदर्भ:- १) व्यसं/ प्रकल्प-३/३३०४/२०२०, दिनांक ०८.१२.२०२०**
**२) मव्य/ प्रकल्प-३/२९/२०२१, दिनांक ०७.०४.२०२१**

उपरोक्त विषयास अनुसरुन महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या 43 व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून एनएसकेएफडीसी योजनेअंतर्गत प्रलंबित कर्ज प्रकरणांत रु. 1.00 लक्ष, रु. 2.00 लक्ष, रु. 3.00 लक्ष, रु. 4.00 लक्ष, रु. 5.00 लक्ष, रु. 10.00 लक्ष व रु. 15.00 लक्षपर्यंतची मुदती कर्ज योजना तसेच सुक्ष्मपत पुरवठा योजना (MCF) रु. 0.60 लक्ष, महिला समृद्धी योजना (MSY) रु. 0.60 लक्ष व महिला अधिकारिता योजना (MAY) रु. 1.00 लक्ष या योजनांचीऑनलाईन पद्धतीने अंमलबजावणी करावयाची आहे.

त्याअनुषंगाने दिनांक 14 जुलै, 2021 सकाळी 9.00 पासून दिनांक 30 जुलै, 2021 सायंकाळी 5.00 पर्यंत महामंडळाच्या mpbcdc.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येतील.

सदर योजनेअंतर्गत राबविण्यात येणारा कालबद्ध कार्यक्रम व ऑनलाईन प्रक्रिया अंमलबजावणी सोबत जोडलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार करावयाची आहे. त्याअनुषंगाने मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद केल्यानुसार प्रक्रियेची अंमलबजावणी विहित मुदतीत करण्यात यावी.

(प्रशांत गेडाम)

महाव्यवस्थापक

सहपत्र-वरीलप्रमाणे


मुख्य कार्यालय : जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस रोड नं.९, जे.व्ही.पी.डी.स्कीम,जुहू, मुंबई-४०००४९.
दुरध्वनी क्र.२६२००३५१/२६२०२८५२ फॅक्स क्र. ०२२-२६७०५१७३ *E-mail: mahatma.phule@yahoo.in*
नोंदणीकृत कार्यालय : २ रा मजला, ठाकरसी हाऊस, विदेशी टपाल कार्यालया जवळ, शुरजी वल्लभदास मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-०१.

**प्रादेशिक व्यवस्थापक/जिल्हा व्यवस्थापक**
**यांच्यासाठी एनएसकेएफडीसी योजना**
**(प्रलंबित कर्ज प्रकरणांत) अंमलबजावणी**
**कार्यालयीन मार्गदर्शक तत्त्वे**
**दिनांक १३ जुलै २०२१**

# मार्गदर्शक तत्त्वे

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळास महाराष्ट्र शासनाने केंद्रीय महामंडळाची वाहिनीकृत यंत्रणा म्हणून नियुक्ती केलेली आहे. केंद्र सरकारच्या सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाकडून (NSKFDC) मिळणाऱ्या कर्ज निधीतून या महामंडळाच्या अंतर्गत सफाई कर्मचारी संवर्गातील व्यक्तींसाठी कर्ज योजना राबविण्यात येते.

एनएसकेएफडीसी या राष्ट्रीय महामंडळाकडून उपलब्ध असलेल्या कर्ज निधीतून सन 2021 या वर्षासाठी पहिल्या टप्प्यात रु. 1.00 लक्ष, रु. 2.00 लक्ष, रु. 3.00 लक्ष, रु. 4.00 लक्ष, रु. 5.00 लक्ष, रु. 10.00 लक्ष व रु. 15.00 लक्षपर्यंतची मुदती कर्ज योजना तसेच सुक्ष्मपत पुरवठा योजना (MCF) रु. 0.60 लक्ष, महिला समृद्धी योजना (MSY) रु. 0.60 लक्ष व महिला अधिकारिता योजना (MAY) रु. 1.00 लक्ष यांची अंमलबजावणी करायची आहे. सदर योजनेअंतर्गत **लाभार्थी निवड समिती दिनांक प्राप्त झालेली कर्ज प्रकरणे तसेच प्रादेशिक कार्यालयामार्फत मुख्यालयास मंजूरी/वितरणाकरिता शिफारस केलेली कर्ज प्रकरणे, शासकीय हमीशुल्क व अर्जदाराचा सहभाग प्राप्त असलेली कर्ज प्रकरणे यांचाच समावेश करणे अनिवार्य आहे. (शासकीय हमीशुल्क व सहभाग भरलेल्या अर्जदारांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.)** नमूद केलेल्या प्रलंबित कर्ज प्रकरणांपैकी जी ऑनलाईन प्रकरणे दस्तावेजांसह परिपूर्ण असतील त्यांना **First Come First Serve** या तत्त्वावर मान्यता देवून वितरीत करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची पात्रता व निकष, अटी व शर्ती, कर्ज मंजूरी/वितरण कार्यपद्धती व कर्ज वसुली खालील नमूद केल्याप्रमाणे आहे.

## I. योजनेचे स्वरुप –

राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (एनएसकेएफडीसी) यांचेकडून प्राप्त LOI पत्र क्र. NSKFDC/PROJ/Maharashtra/18/2019-20/2312, Dt. 18.03.2020 नुसार विविध प्रकल्प मुल्याचे विवरण खालीलप्रमाणे नमूद केले आहे. संबंधित अर्जदाराने प्रलंबित असलेल्या कर्ज प्रकरणांत व्यवसाय करण्याकरिता खालीलप्रमाणे अर्ज करावेत.

### मुदती कर्ज योजना

i)

| अ.क्र. | प्रकल्प मूल्य | रु. १,००,०००/- पर्यंत |
|---|---|---|
| 1. | केंद्रीय महामंडळाचा सहभाग (एनएसकेएफडीसी) | रु. 90,000/- (6% व्याजदर) |
| 2. | अर्जदाराचा सहभाग (प्रकल्प मूल्याच्या 10%) | रु. 10,000/- |
| 3. | कर्ज परतफेड कालावधी | 5 वर्षे (समान मासिक 60 हप्ते) |
| 4. | हमीशुल्क दर 0.50 पैसे प्रमाणे | रु. 2250/- |

ii)

| अ.क्र. | प्रकल्प मूल्य | रु. २,००,०००/- पर्यंत |
|---|---|---|
| 1. | केंद्रीय महामंडळाचा सहभाग (एनएसकेएफडीसी) | रु. 1,80,000/- (6% व्याजदर) |
| 2. | अर्जदाराचा सहभाग (प्रकल्प मूल्याच्या 10%) | रु. 20,000/- |
| 3. | कर्ज परतफेड कालावधी | 5 वर्षे (समान मासिक 60 हप्ते) |
| 4. | हमीशुल्क दर 0.50 पैसे प्रमाणे | रु. 4500/- |

iii)

| अ.क्र. | प्रकल्प मूल्य | रु. ३,००,०००/- पर्यंत |
|---|---|---|
| 1. | केंद्रीय महामंडळाचा सहभाग (एनएसकेएफडीसी) | रु. 2,70,000/- (6% व्याजदर) |
| 2. | अर्जदाराचा सहभाग (प्रकल्प मूल्याच्या 10%) | रु. 30,000/- |
| 3. | कर्ज परतफेड कालावधी | 5 वर्षे (समान मासिक 60 हप्ते) |
| 4. | हमीशुल्क दर 0.50 पैसे प्रमाणे | रु. 6750/- |

iv)

| अ.क्र. | प्रकल्प मूल्य | रु. ४,००,०००/- पर्यंत |
|---|---|---|
| 1. | केंद्रीय महामंडळाचा सहभाग (एनएसकेएफडीसी) | रु. 3,60,000/- (6% व्याजदर) |
| 2. | अर्जदाराचा सहभाग (प्रकल्प मूल्याच्या 10%) | रु. 40,000/- |
| 3. | कर्ज परतफेड कालावधी | 5 वर्षे (समान मासिक 60 हप्ते) |
| 4. | हमीशुल्क दर 0.50 पैसे प्रमाणे | रु. 9000/- |

v)

| अ.क्र. | प्रकल्प मूल्य | रु. ५,००,०००/- पर्यंत |
|---|---|---|
| 1. | केंद्रीय महामंडळाचा सहभाग (एनएसकेएफडीसी) | रु. 4,50,000/- (6% व्याजदर) |
| 2. | अर्जदाराचा सहभाग (प्रकल्प मूल्याच्या 10%) | रु. 50,000/- |
| 3. | कर्ज परतफेड कालावधी | 5 वर्षे (समान मासिक 60 हप्ते) |
| 4. | हमीशुल्क दर 0.50 पैसे प्रमाणे | रु. 11,250/- |

vi)

| अ.क्र. | प्रकल्प मूल्य | रु. १०,००,०००/- पर्यंत |
|---|---|---|
| 1. | केंद्रीय महामंडळाचा सहभाग (एनएसकेएफडीसी) | रु. 9,00,000/- (6% व्याजदर) |
| 2. | अर्जदाराचा सहभाग (प्रकल्प मूल्याच्या 10%) | रु. 1,00,000/- |
| 3. | कर्ज परतफेड कालावधी | 5 वर्षे (समान मासिक 60 हप्ते) |
| 4. | हमीशुल्क दर 0.50 पैसे प्रमाणे | रु. 22,500/- |

vii)

| अ.क्र. | प्रकल्प मूल्य | रु. १५,००,०००/- पर्यंत |
|---|---|---|
| 1. | केंद्रीय महामंडळाचा सहभाग (एनएसकेएफडीसी) | रु. 13,50,000/- (6% व्याजदर) |
| 2. | अर्जदाराचा सहभाग (प्रकल्प मूल्याच्या 10%) | रु. 1,50,000/- |
| 3. | कर्ज परतफेड कालावधी | 5 वर्षे (समान मासिक 60 हप्ते) |
| 4. | हमीशुल्क दर 0.50 पैसे प्रमाणे | रु. 33,750/- |

## सुक्ष्मपत पुरवठा योजना

viii)

| अ.क्र. | प्रकल्प मूल्य | रु. ६०,०००/- पर्यंत |
|---|---|---|
| 1. | केंद्रीय महामंडळाचा सहभाग (एनएसकेएफडीसी) | रु. 54,000/- (5% व्याजदर) |
| 2. | अर्जदाराचा सहभाग (प्रकल्प मूल्याच्या 10%) | रु. 6,000/- |
| 3. | कर्ज परतफेड कालावधी | 5 वर्षे (समान मासिक 60 हप्ते) |
| 4. | हमीशुल्क दर 0.50 पैसे प्रमाणे | रु. 1350/- |

## महिला समृद्धी योजना

ix)

| अ.क्र. | प्रकल्प मूल्य | रु. ६०,०००/- पर्यंत |
|---|---|---|
| 1. | केंद्रीय महामंडळाचा सहभाग (एनएसकेएफडीसी) | रु. 54,000/- (4% व्याजदर) |
| 2. | अर्जदाराचा सहभाग (प्रकल्प मूल्याच्या 10%) | रु. 6,000/- |
| 3. | कर्ज परतफेड कालावधी | 5 वर्षे (समान मासिक 60 हप्ते) |
| 4. | हमीशुल्क दर 0.50 पैसे प्रमाणे | रु. 1350/- |

## महिला अधिकारिता योजना

x)

| अ.क्र. | प्रकल्प मूल्य | रु. १,००,०००/- पर्यंत |
|---|---|---|
| 1. | केंद्रीय महामंडळाचा सहभाग (एनएसकेएफडीसी) | रु. 90,000/- (6% व्याजदर) |
| 2. | अर्जदाराचा सहभाग (प्रकल्प मूल्याच्या 10%) | रु. 10,000/- |
| 3. | कर्ज परतफेड कालावधी | 5 वर्षे (समान मासिक 60 हप्ते) |
| 4. | हमीशुल्क दर 0.50 पैसे प्रमाणे | रु. 2250/- |

*** भविष्यात जनहितार्थ आवश्यकतेनुसार बदल करण्यात येईल.**

*** सदर योजनेच्या अंमलबजावणीचे सर्व अधिकार महामंडळ स्वत:कडे राखून ठेवत आहे.**

## II. योजनेचा उद्देश –

1. सफाई कर्मचारी संवर्गातील लोकांना सफाई कामापासून वंचित करुन त्यांचे पुनर्वसन करणे.
2. सफाई कर्मचारी संवर्गातील लोकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे. तसेच बँकेमार्फत कर्ज घेताना येणाऱ्या अडचणी व कर्ज मंजूर होताना होणारा विलंब टाळणे.
3. सफाई कर्मचारी घटकांना लघु व्यवसाय सुरु करण्याकरिता तात्काळ वित्त पुरवठा करणे.
4. उपरोक्त योजनेअंतर्गत रु. 1.00 लक्ष, रु. 2.00 लक्ष, रु. 3.00 लक्ष, रु. 4.00 लक्ष, रु. 5.00 लक्ष, रु. 10.00 लक्ष व रु. 15.00 लक्षपर्यंतची मुदती कर्ज योजना तसेच सुक्ष्मपत पुरवठा योजना रु. 0.60 लक्ष, महिला समृद्धी योजना रु. 0.60 लक्ष व महिला अधिकारिता योजना रु. 1.00 लक्ष यांची अंमलबजावणी करण्यात येईल.

**व्यवसायाचे गट**

i. कृषी व ग्रामीण क्षेत्रातील व्यवसाय

ii. कुटीरोद्योग व्यवसाय

iii. लघुउद्योग क्षेत्रातील व्यवसाय

iv. सेवा व वाहतूक क्षेत्रातील व्यवसाय

i. तांत्रिक व संगणक व्यवसाय

ii. अपारंपारिक ऊर्जेशी संबंधित व्यवसाय

## III. लाभार्थ्यांची पात्रता व निकष

1. अर्जदार हा सफाई कर्मचारी/सफाई कर्मचारी कुटुंबातील अवलंबित असावा.
2. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
3. अर्जदाराचे वय 18 वर्षे पेक्षा जास्त असावे.
4. अर्जदाराचा सिबिल क्रेडीट स्कोअर किमान 500 इतका असावा.
5. अर्जदाराने आधारकार्ड जोडलेल्या बँक खात्याचा तपशील सादर करावा.
6. अर्जदार महामंडळाच्या कोणत्याही (केंद्र व राज्य) योजनेचा थकबाकीदार नसावा.

## IV. अटी व शर्ती

1. अर्जदाराने उद्यमी आधार यामध्ये नोंदणीकृत असणे आवश्यक.
2. अर्जदाराने यापूर्वी महामंडळास सादर केलेला सफाई कर्मचारी दाखला त्याच क्षेत्रातील सक्षम अधिकाऱ्याकडून साक्षांकित/प्रमाणित करुन घेणे आवश्यक. (नवीन सफाई दाखला स्वीकारण्यात येणार नाही.)
3. कर्ज परतफेडीबाबत लाभार्थीने शपथपत्र द्यावे लागेल.

1. सदर कर्जातून लाभार्थीसाठी जी मत्ता निर्माण होणार आहे ती ज्यांच्याकडून निर्माण होईल त्यांचेकडून ती मत्ता अचल (Immovable) असेल तर परस्पर या महामंडळाकडे गहाण (Mortgage) ठेवण्यात यावी. जर ती मत्ता चल (movable) असेल तर ती महामंडळाकडे तारणगहाण (Hypothecate) करणे आवश्यक.
2. जामीनदार हा नोकरदार/शासकीय/निम शासकीय/राष्ट्रीयीकृत, सहकारी बँक येथील अधिकारी/कर्मचारी असणे आवश्यक.
3. जामीनदार स्वत: कर्ज परतफेडीची हमी घेत असल्याने त्यांनी स्वत:चे आयकर परतावा (Income Tax Return) प्रमाणपत्र तसेच जामीनदार ज्या संस्थेत काम करीत आहे, तेथील वेतन प्रमाणपत्राची प्रत देणे बंधनकारक आहे. जामीनदार हा शेतकरी असल्यास 7/12 उतारा प्रत द्यावी लागेल.

**V. लाभधारकांचे अर्ज स्वीकृती कार्यक्रम**

1. दिनांक 14 जुलै, 2021 सकाळी 9.00 पासून दिनांक 30 जुलै, 2021 सायंकाळी 5.00 पर्यंत महामंडळाच्या mpbcdc.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येतील.
2. ऑनलाईन अर्जासोबत फक्त वैयक्तिक माहितीच्या कागदपत्रांच्या प्रती दाखल करावयाच्या आहेत. (1) अर्जदाराचा फोटो (2) सफाई कर्मचारी दाखला (3) आधारकार्ड (पुढील व मागील झेरॉक्स प्रत) (4) पॅन कार्ड (5) शिधापत्रिका (6) प्रकल्प अहवाल (7) व्यवसायाच्या जागेचा पुरावा (8) उद्यम आधारकार्ड (9) अधिकृत विक्रेत्याचे व्यवसायाबाबतचे किंमतीपत्रक
3. जामीनदार, साक्षीदार, शपथपत्रे, व्यवसाय परवाने, मालमत्ता गहाणपत्र, कर्ज परतफेड शपथपत्र, अधिकृत विक्रेत्याचे व्यवसायाबाबतचे किंमतीपत्रक इ. पुराव्यांच्या कागदपत्राच्या प्रती मुख्य कार्यालयाच्या आदेशानंतर प्रत्यक्ष कर्ज वाटपाचे वेळी ऑनलाईन दाखल कराव्या लागतील.
4. अर्जदाराने हमीशुल्क, सहभाग रक्कम अथवा इतर कोणतेही शुल्क रक्कम अर्जासोबत महामंडळास भरणा करावयाची नाही.
5. माहितीसाठी महामंडळाचे जिल्हा कार्यालयात अर्जाचा नमुना व कागदपत्रांची सूची उपलब्ध ठेवावी. अधिक मार्गदर्शनाकरिता संबंधित जिल्हा व्यवस्थापक यांचेशी संपर्क साधावा.

**६. उद्दिष्टांपेक्षा जास्त कर्ज प्रकरणे प्राप्त झाल्यास सदर संगणक प्रणाली Auto Lock (बंद) होईल.**

**VI. अर्जाची छाननी, व्यवसायाच्या जागेची स्थळ तपासणी, प्राथमिक मंजूरी व शिफारस कार्यपद्धती**

1. कर्ज मागणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरणे बंधनकारक राहिल.
2. जिल्हा व्यवस्थापक यांनी स्थळ पाहणी करुन पात्रता निश्चित करणे.
3. अर्ज स्वीकृतीचे अंतिम तारखेनंतर कर्ज मागणी अर्जाची स्थळ पाहणी 8 दिवसांत पूर्ण करुन पात्रता निश्चित करणे, स्थळ पाहणी व पंचनामा करणे.
4. रु. 1.00 लक्ष, रु. 2.00 लक्ष, रु. 3.00 लक्ष, रु. 4.00 लक्ष, रु. 5.00 लक्ष, रु. 10.00 लक्ष व रु. 15.00 लक्षपर्यंतची मुदती कर्ज योजना तसेच सुक्ष्मपत पुरवठा योजना रु. 0.60 लक्ष, महिला समृद्धी योजना रु. 0.60 लक्ष व महिला अधिकारिता योजना रु. 1.00 लक्ष कर्ज प्रकरणांस प्राथमिक मंजूरी देण्याचे अधिकार प्रादेशिक व्यवस्थापक यांना असतील. प्रादेशिक व्यवस्थापक हे जिल्हा कार्यालयास भेट देवून जिल्हा व्यवस्थापक यांनी स्थळ पाहणी करुन पात्र ठरविलेल्या लाभार्थ्यांच्या प्रकरणांत प्राथमिक मंजूरी देतील.
5. ज्या प्रकरणात कागदपत्रे अपूर्ण असतील अशी कर्ज प्रकरणे अपात्र ठरवून तात्काळ रद्द करण्यात यावीत. मात्र कोणतेही प्रकरणांत जिल्हा व्यवस्थापक किंवा प्रादेशिक व्यवस्थापक यांचे कार्यालयाकडून त्रुटी पत्रे पाठवू नयेत.

6. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्या अर्जास संगणकीय प्रणालीमार्फत संदर्भ क्रमांक देण्यात येतो. हा संदर्भ क्रमांक अर्जदाराचे मोबाईलवर देखील त्याचवेळी कळविण्यात येतो.
7. अर्जदारास संगणकीय प्रणालीकडून दिलेल्या संदर्भ क्रमांकाची यादी अंतिम व कायम स्वरुपी समजली जाईल व त्यानुसार पुढील कार्यवाही होईल.
8. संगणकीय क्रमांकाच्या यादीतील नावे व क्रमांकच अंतीम असतील. त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही क्रमांक जसे जिल्ह्यातील रजिस्टर क्रमांक, प्रादेशिक कार्यालयातील रजिस्टर क्रमांक किंवा मुख्यालयाचे रजिस्टर क्रमांक (HQ क्रमांक) इत्यादी कोणतेही क्रमांक देण्यात येवू नयेत.
9. जिल्हा व्यवस्थापक व प्रादेशिक व्यवस्थापक यांनी एनएसकेएफडीसी कर्ज योजना यादीतील संगणकीय क्रमांकानुसारच संपूर्ण यादी एकदाच मुख्य कार्यालयास शिफारस करणे बंधनकारक आहे. कोणत्याही परिस्थितीत संगणकीय क्रमांक डावलून किंवा नावे मागे पुढे करुन अथवा अर्धवट यादीची शिफारस करु नये व अशी बाब निदर्शनास आल्यास सक्त प्रशासकीय कार्यवाही केली जाईल.

## VII. कर्ज वितरण कार्यपद्धती

कर्ज योजनेकरिता First Come First Serve या तत्त्वावर लाभार्थ्यांची निवड करण्याची तसेच महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या कर्जाच्या वसुलीची संपूर्ण जबाबदारी जिल्हास्तरीय कार्यालयाची राहिल. याबाबत पुढीलप्रमाणे कार्यपद्धती अनुसरण्यात यावी.

1. सदर योजनेअंतर्गत लाभार्थी निवड समिती दिनांक प्राप्त झालेली कर्ज प्रकरणे तसेच प्रादेशिक कार्यालयामार्फत मुख्यालयास मंजूरी/वितरणाकरिता शिफारस केलेली कर्ज प्रकरणे, शासकीय हमीशुल्क व अर्जदाराचा सहभाग प्राप्त असलेली कर्ज प्रकरणे यांचाच समावेश करणेत येईल.
2. शासकीय हमीशुल्क व सहभाग भरलेल्या अर्जदारांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
3. सदर योजनेअंतर्गत द्विनोंद पद्धतीने मुख्य कार्यालयातून अर्जदाराच्या बँक खात्यात कर्ज रकमेचे वितरण करणेत येईल.
4. कर्ज वितरणानंतर संबंधित जिल्हा कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचेसह अर्जदार व अर्जदाराने उभारलेल्या व्यवसायाचे एकत्रित छायाचित्र तसेच उपयोगिता प्रमाणपत्र मुख्यालयास सादर करणे अनिवार्य आहे.

## VIII. वसुलीची कार्यपद्धती

1. कर्जाची परतफेड ही कर्ज वितरीत केल्याच्या 3 महिन्यानंतर सुरु करण्यात येईल.
2. कर्ज परताव्याचे मासिक हप्ते ठरवून कर्ज वसुलीच्या दृष्टीने लाभार्थ्यांच्या बँक खात्यातून ECS (इलेक्ट्रॉनिक क्लिअरंस सिस्टिम) पद्धतीने वसुली करण्यात येईल.
3. कर्जाची वसुली न झाल्यास महामंडळामार्फत कायदेशीर कार्यवाही सुरु करण्यात येईल.

4. जामिनदाराकडून कर्ज वसुली शक्य न झाल्यास जमीन महसूलसंहितेच्या कलम 221 नुसार जिल्हाधिकारी यांना मालमत्ता लिलाव करुन कर्ज वसुली करण्याचा प्रस्ताव दाखल करण्यात येईल.

5. वसुलीकरिता भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचना कार्यपद्धतीप्रमाणे वसुलीची प्रक्रिया राबविण्यात येईल.

- एनएसकेएफडीसी योजना अंमलबजावणीच्या उपरोक्त मार्गदर्शक सूचनांमध्ये होणारे बदल व समाविष्ट करावयाच्या सूचना स्वतंत्रपणे वेळोवेळी कळविण्यात येतील.
- या योजनेच्या अनुषंगाने भरावयाचे फॉर्म, पंचनामा व इतर संदर्भिय कागदपत्रे जोडली आहेत. हेच विहित नमुने वापरण्यात यावे.

**प्रशांत गेडाम**
**महाव्यवस्थापक**

**मुख्य कार्यालय : जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस रोड नं.९, जे.व्ही.पी.डी.स्कीम,जुहू, मुंबई-४०००४९.**
**दुरध्वनी क्र.२६२००३५१/२६२०२८५२ फॅक्स क्र. ०२२-२६७०५१७३** ***E-mail: mahatma.phule@yahoo.in***
**नोंदणीकृत कार्यालय : २ रा मजला, ठाकरसी हाऊस, विदेशी टपाल कार्यालया जवळ, शुरजी वल्लभदास मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-०१.**
**दूरध्वनी क्र. २२६२१९३१/२२६२१९३४,** ***E-mail: regionofficemumbai21@gmail.com***

# *MPBCDC LMS Portal*


**In order to apply for State Government and Central Government scheme please follow below mention steps**

**Step 1 –**


- Visit Website
- link - [https://mpbcdc.maharashtra.gov.in/](https://mpbcdc.maharashtra.gov.in/)

**Step 2 –**

- New user need to register themselves



- Registration form needs to be filled as per instruction and follow the notes mentioned to generate valid credentials for login
- All mandatory fields need to filled and validated in order to generate login.
    1. First Name
    2. Middle Name
    3. Last Name
    4. Date Of Birth (Select date from Calendar)
    5. Age (Auto Calculate based on Date of Birth – should be minimum 18years old)
    6. Gender (Male, Female or Transgender)
    7. Email ID (Optional)
    8. Mobile No (OTP verification process)
    9. Username (Should be unique – Availability of username to be checked)
    10. Password and Confirm Password (Should be same and as per the password criteria mentioned)


Note: All * marked fields are mandatory
Note: Keep your Mobile phone handy during the registration process

APPLICANT REGISTRATION

First Name * Enter First Name
Middle Name * Enter Middle Name
Last Name * Enter Last Name
Date of Birth *
Age * 0
Gender * --Select--
Email ID Enter Email ID
Mobile No * Enter MobileNo
GET OTP FOR MOBILE NO VERIFICATION
UserName * Enter UserName
CHECK USERNAME AVAILABILITY
Password * ********
Confirm Password * ********


Note : Password must contains one digit from 0-9 and contains atleast one lowercase characters and one uppercase characters, Must contains one special symbols in the list @#$%' and Password length atleast 7 character and maximum 20 character. Ex - Applicant@123

NWVCZ
Try another
Enter the text you see above:

SAVE RESET BACK


**Step 3 –**

- Post registration, confirmation will be receive through SMS along with website link for Login





**Step 3.1** –

- Forgot Username – Applicant needs to enter registered mobile number on which username will be forwarded through SMS.




**Step 3.2 –**

- Forgot Password – Applicant need to enter registered mobile number for OTP verification
- Post OTP verification, Applicant will be asked to set new password




**Step 4 –**


- Post Login Click on **Application Form** to apply for Scheme available as per State Government and Central Government




**Step 5.1 –**


- Enter **Basic Details (Margin Money Scheme)** and proceed to next screen
- Mandatory field mentioned should be entered in order to proceed
  1. Middle Name (Editable)
  2. Father’s Name
  3. Mother’s Name
  4. Husband Name (Optional)
  5. Caste Name

6. Sub Caste Name
7. Basic Education
8. Ration card Type
9. Proposed Business Name
10. Family Annual Income





**Step 5.2 –**

- Enter **Basic Details (NSKFDC Scheme)** and proceed to next screen
- Mandatory field mentioned should be entered in order to proceed
    1. Middle Name (Editable)
    2. Father's Name
    3. Mother's Name
    4. Husband Name (Optional)
    5. Basic Education
    6. Ration card Type
    7. Proposed Business Name




**Step 6 –**

- Enter **Address Details** as per option and selection available
- All fields in Address Details are mandatory
    1. Urban/Rural
    2. District
    3. Taluka
    4. Present Address (House No/Flat No, Building Name, Area/Landmark and Pin code)
    5. Permanent Address (House No/Flat No, Building Name, Area/Landmark and Pin code)





**Step 7.1 –**

- Enter **Family Details (Margin Money Scheme)** as per option and selection available
- All fields are mandatory in order to enter family details
    1. Person Name
    2. Age
    3. Relation
    4. Occupation
    5. Monthly Income
    6. Annual Income





**Step 7.2 –**

- Enter **Family Details (NSKFDC Scheme)** as per option and selection available
- All fields are mandatory in order to enter family details
    1. Person Name
    2. Age
    3. Relation
    4. Occupation




**Step 8 –**


- Enter **Business Reference Details** as per Business Planning to establish
- All fields are mandatory in order to submit Business Reference Details
    1. Business Name
    2. Currently invested capital in which the business is established in Rs
    3. Details of Plan
    4. The Address of the place of Business
    5. Land Owned or Rented?





**Step 9 –**


- Documents required as per the Scheme to be uploaded with application form are mentioned along with criteria with respect to file size, file width, file height and file type respectively.
- Documents for **Margin Money Scheme –**
    1. Photograph (Mandatory)
    2. Signature (Mandatory)
    3. Udyam Aadhar copy (Mandatory)
    4. Address Proof copy (Mandatory)
    5. Copy of Aadhar card - Front (Mandatory)
    6. Copy of Aadhar card - Back (Mandatory)
    7. Cast Certificate (Mandatory)
    8. Copy of Pan Card (Optional)


- Documents for **NSKFDC Scheme –**
    1. Photograph (Mandatory)
    2. Signature (Mandatory)
    3. Udyam Aadhar copy (Mandatory)
    4. Address Proof copy (Mandatory)
    5. Copy of Aadhar card - Front (Mandatory)
    6. Copy of Aadhar card - Back (Mandatory)
    7. Safai Karmachari Dhakla (Mandatory)
    8. Copy of Pan Card (Optional)





- Photograph and Signature crop functionality





Crop Signature
Crop Photo


Image Resizing & Cropping
Select File
Select a File to Upload
Choose File No file chosen
Upload and proceed to crop
Upload Files
Clear



Image Resizing & Cropping
Adjust the image and click here to crop
Crop Image
Click here to download crop image
Download
Cancel
Click here to Download

**Step 10 –**

- Summary of the application will be shown before submission





- Final submission will submit the application



**Step 11 –**

- Click on View Form from Dashboard to Print recently submitted application




- PRINT option to take print-out/Save as PDF, of filled application form for submission of application at respective office

